**<u>फौजदारी अपील क्र. ३८/२०२४</u>**
MHWR010013482024
निलेश बावणकर -वि- शासन व इतर
**आदेश नि.क्र.६ वर**

अर्जदारांचे विधीज्ञ श्री.व्ही.जी.देवघरे, यांचा युक्तीवाद ऐकला. न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. नियमित फौ.ख.क्र.२१६/२०१७ मध्ये दिनांक ०२/०८/२०२४ रोजी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.१) वर्धा यांनी सदरील आरोपी/अपिलार्थीला भा.दं.वि.चे कलम ३५४, ४५२ चे गुन्हयाकरिता सिद्धदोषी ठरवून १ वर्षाची सश्रम कारावासाची व प्रत्येकी रु.३,०००/- (एकुण रूपये ६०००/-) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली आहे. सदरील न्यायनिर्णयाविरुद्ध अपिलार्थीने अपील दाखल केले आहे. आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम खालील न्यायालयात दिनांक ०२.०८.२०२४ रोजी भरलेली आहे. सदरील अपिलाचे सुनावणीकरिता बराच कालावधी लागेल. त्यामुळे माझे मते भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४३० प्रमाणे अपिलाचा निकाल लागेपर्यंत आरोपीस झालेल्या शिक्षेच्या अमंलबजावणीस स्थगिती देणे योग्य होईल. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

(१) नियमित फौ.ख.क्रं. २१६/२०१७ मध्ये न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.१) वर्धा यांनी भा.दं.वि.चे कलम ३५४ चे गुन्हयाकरिता आरोपीस दिलेली १ वर्षाची सश्रम कारावासाची व कलम ४५२ चे गुन्हयाकरिता १ वर्षाची सश्रम कारावासाचे शिक्षेच्या अमंलबजावणीस सदरील अपिलाचा निकाल लागेपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

(२) अपिलार्थी/आरोपीने वैयक्तीक जातमुचलका रक्कम ५०,०००/- व तितक्याच रक्कमेच्या एका जामिनदाराचे जामीनबंध पत्रावर जामिनावर सोडण्यात येत आहे.

(३) सदरील आदेश खालील न्यायालयास कळवावा.

NANDKUMAR BHAUSAHEB SHINDE

Digitally signed by NANDKUMAR BHAUSAHEB SHINDE
Date: 2024.09.04 18:22:10 +0530

दि. ०४/०९/२०२४ (एन.बी. शिंदे)
वर्धा. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वर्धा.

फौ.अपील क्रं. ३८/२०२४

***C E R T I F I C A T E***

*I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the assigned Judgment.*

*(S.R.Bire)*
Stenographer (Grade-II)